# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. वसंत केरु गायकवाड

### मु.पो. आपटी, ता. दापोली, जि. रत्नागिरी



५४

- रत्नागिरी जिल्हयातील उच्चशिक्षित प्रगतशील शेतकरी असून ३.५० हेक्टर क्षेत्र.
- शेतावर शेणखत व गांडूळखत निर्मीती करुन भातशेतीमध्ये संकरीत बियाणे व चारसुत्री पध्दती वापरुन भरघोस उत्पादन.
- भाजीपाला पिकामध्ये एकात्मिक किड व्यवस्थापन करून जैविक किडनाशके, कामगंध सापळे तसेच प्रकाश सापळे यांचा वापर.
- भाजीपाल्याच्या भरघोस उत्पादनानंतर शेतमालाची विक्री करण्यासाठी स्वपत्नीक स्थानिक बाजारपेठेत विक्री करणे.
- दापोली तालुक्यातील भाजीपाला पिकविणा-या शेतकरी संघाची स्थापना.
- कार्याबद्दल 'सेवाव्रती पांडुरंग शिंदे गुरुजी स्मृती पुरस्कार' तसेच कुणबी सेवा संघ दापोली तर्फे 'उत्कृष्ट शेतकरी' म्हणून गौरव.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. सुधाकर प्रकाश वाघ

### मु.पो. खलाणे, ता. सिंदखेडा, जि. धुळे



- शेतामध्ये शेततळे घेऊन संरक्षित सिंचनाची सोय निर्माण केली. बांधबंदिस्तीची कामे करुन शेतातील पाणी शेतातच जिरवल्याने भुगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ.
- डाळिंब, पपई, केळी, कांदा, लिंबू, कापूस, मका यासारख्या पिकांची आधुनिक पध्दतीचा अवलंब करुन लागवड.
- पिकांच्या अवशेषांपासुन कंपोस्ट खत तयार करुन शेतात वापर.
- पडीक जमिनीवर सुबाभूळ लागवड केली असुन त्यापासुन मिळणा-या पाल्याचा हिरवळीचे खत म्हणून वापर.
- कांदा बिजोत्पादनाचा कार्यक्रम.
- शेतीला जोडधंदा म्हणुन पशूपालन व दुग्धव्यवसाय.

५५

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. प्रकाश खुशाल पाटील

### मु. पो. म्हसावद, ता. शहादा, जि. नंदूरबार



५६

- कृषि विभागाच्या मदतीने व स्वत: विविध कृषि विद्यापीठांना भेटी देवुन प्रगत तंत्रज्ञान आत्मसात केले.
- कृषि विभागाच्या फळबाग लागवड योजनेंतर्गत डाळिंब, केळी, आवळा, पपई या फळपीकांची लागवड करून ठिबक व तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब.
- इंदौर, सुरत, पुणे आणि मुंबई यासारख्या मोठया शहरांमध्ये फळ विक्री.
- ट्रॅक्टर चलीत अवजारांच्या सहाय्याने फळपीकामध्ये आंतरमशागत.
- फळबागामध्ये आंतरपीक पध्दतीचा अवलंब.
- वेळोवेळी कृषि विभागाचे मार्गदर्शन घेऊन इतर शेतक-यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. साहेबराव नामदेव मोहिते

### मु. पो. काटी, ता. इंदापूर, जि. पुणे



५७

- शेतामध्ये अडीच कोटी लिटर व एक कोटी लिटर क्षमतेची शेततळी.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानमधून भगवा जातीच्या डाळींबाची शास्त्रोक्त पध्दतीने लागवड.
- बागेच्या विश्रांतीच्या काळात पहिल्या एक दोन महिन्यातच संपूर्ण वर्षभराची लिंबोळी पेंड, रासायनीक खते, शेणखत व सुक्ष्ममुलद्रव्ये देतात.
- डाळींब शेतीचे प्रयोग परीसरातील शेतक-यांना मार्गदर्शक.
- खंडीत होणा-या विद्युत पुरवठ्याला पर्याय म्हणून आधुनिक पध्दतीचा पाणी उपसण्या-या ट्रॅक्टर पंपाचा वापर.
- संपूर्ण शेतीमध्ये सेंद्रिय खताचा मोठ्या प्रमाणावर वापर
- परिसरातील शेतक-यांसाठी स्वतःच्या शेतीवर चर्चासत्राचे आयोजन करुन मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

### श्री. सचिन अरुणराव जगताप

मु. बनपिंपरी, पो. मांडवगण, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर



- स्वतःचा वकिली व्यवसाय सांभाळून शेतीची आवड जोपासली.
- १० एकर केळी, ५ एकर अंजीर, ३ एकर मोसंबी तसेच इतर फळझाडांमध्ये आंबा, चिंच व नारळ यांची लागवड.
- पट्टा पध्दतीने ऊस लागवड करुन सरासरी एकरी ८५ टनापर्यंत उत्पादन. संस्थांना भेटी देऊन आधुनिक तंत्रज्ञान अवगत.
- खिलार गायींची जोपासना.
- नगर जिल्हा परिषदेमार्फत 'प्रगतशील शेतकरी' व 'कृषि रत्न पुरस्कार' देऊन सन्मान.

५८

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. अविनाश अरविंद जामदार

### मु. कोकणगाव, पो. हिरडगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर



५९

- वैद्यकीय व्यवसाय सांभाळून शेतीची आवड जोपासली.
- उन्हाळयात जाणवणा-या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शेततळे घेतले.
- गव्हाची पेरणी करताना बियाणे बरोबर गांडूळ खतांची पेरणी करून एकरी ३० क्विं. पर्यत उत्पादन .
- गांडूळ खत निर्मीती प्रकल्प उभारला असून सर्व फळपिकांना स्लरीचा वापर.
- डाळिंबांची हॉलंड व बांगला देशात निर्यात करीत असून सेंद्रिय पध्दतीचा अवलंब केल्यामुळे उत्कृष्ट बाजारभाव.
- या कार्याबद्दल जिल्हा परीषदेमार्फत 'प्रगतशील शेतकरी' म्हणून गौरव.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. रवि अशोक पाटील

### मु.पो. अंकलखोप, ता. पलुस, जि. सांगली



- कृषि विभागाच्या मदतीने तसेच कृषि विद्यापीठे व विविध संस्थाना भेटी देऊन प्रगत तंत्रज्ञान आत्मसात केले.
- पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन तालुकास्तरावर सोयाबीन पीकाकरीता प्रथम क्रमांक.
- ऊस पिकामध्ये पाचट व्यवस्थापन व हिरवळीच्या खतांचा वापर आणि एक डोळा पध्दतीने लागवड.
- जी-९ या केळी पिकाचे २० गुंठयामध्ये १३ टन उत्पादन.
- गावामध्ये कृष्णामाई कृषि विज्ञान मंडळाची स्थापना करून असून मंडळाच्या माध्यमातुन सामुहीक शेतीचा प्रकल्प यशस्वीपणे राबविला.
- साम टी. व्ही व ए.बी.पी माझा या दुरचित्रवाहीन्यावर शेतीविषयक मुलाखती.
- स्वतः शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य असून गावात नाबार्डचे शेतकरी मंडळ स्थापन करुन नाबार्डच्या कृषि विषयक योजना राबवित आहेत.

६०

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. आनंदराव गणपत शिंदे

### मु.पो. बोरगाव, ता.जि.सातारा



- शेतात नारळ झाडे, आंबा, कोईमतूर शेवगा, केळी, पपई व सागाची लागवड
- नारळाच्या बागेत आंतरपीक म्हणुन दालचिनी, मिरी, जायफळ, लवंग, तमालपत्र ही मसाल्याची पिके.
- रासायनिक खतांचा वापर न करता संपुर्णपणे सेंद्रिय खत, गांडूळ खत, शेणखत व निंबोळी पेंड यांचा वापर.
- गहू पिकाचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविला.
- किटकनाशकांची खरेदी न करता दशपर्णी अर्क, गोमुत्राचा वापर.
- शेतीस जोडधंदा म्हणून मत्स्यपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन.
- जिल्हा परीषदेच्या वतीने 'डॉ.जे.के.बसू सेंद्रिय व आधुनिक शेती पुरस्कार' तसेच 'श्री. सेवागिरी शेतीनिष्ठ' पुरस्काराने गौरव.

६१

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. बाबासाहेब अण्णासाहेब शिंदे

### मु. पो. शिवराई, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद



- दोन एकर क्षेत्रामध्ये ठिबक सिंचन व प्लॅस्टीक आच्छादनाचा वापर करुन कलिंगड पिकांचे ९० दिवसात ४४ मेट्रीक टन विक्रमी उत्पादन.
- खरीप हंगामात शुन्य मशागतीवर कपाशीचा मल्लीका-२०७ हा वाण घेऊन दोन एकरामध्ये ४२ क्विंटल विक्रमी उत्पादन.
- आठ गुंठयामध्ये ३१ क्विंटल हळद पिकाचे विक्रमी उत्पादन.
- मशागतीसाठी ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, सरीयंत्र व पेरणीयंत्र इत्यादी सुधारीत औजारे.
- डाळींब उत्पादक शेतकयांचा गट तयार करुन गटातील शेतकयांना शेततळे, अपारंपारीक उर्जास्त्रोत बायोगॅस व कपाशीसाठी एक गाव एक वाण, कपाशीची सघन लागवड या सारख्या उपक्रमांना प्रोत्साहन.
- स्वखर्चाने विहीर पुनर्भरण करुन गटातील सर्व सदस्यांना विहीर पुनर्भरणासाठी प्रोत्साहित.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. बाबासाहेब रंगनाथ खांडेभराड

### मु.पो. माहेर भायगाव, ता. अंबड, जि. जालना



- डाळींब, मोसंबी, आवळा, आंबा इत्यादी फळपिकाची लागवड.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत दिड कोटी लिटर क्षमतेचे सामूहिक शेततळे घेवून पूर्ण फळबाग ठिंबक सिंचनाखाली.
- आत्मा योजनेअंतर्गत संतकृपा डाळींब उत्पादक बचत गटांची स्थापना करुन याव्दारे कृषि व पणन विभागाच्या विविध योजना ग्रामस्तरावर राबविल्या.
- बायोगॅस संयंत्र उभारले असुन त्यापासून निघणा-या शेणकाल्याचा वापर गांडुळ खत तयार करण्यासाठी .
- शेतीबरोबरच पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय.
- शेतकरी मेळावे व शेतक-यांच्या सहलीचे आयोजन करुन शेतक-यांना कृषि विषयक मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. तात्यासाहेब तुळशीराम गोरे

### मु. पो. अंतरगाव, ता. भूम, जि. उस्मानाबाद



६४

- १९७८ साली द्राक्ष पिकाची आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन लागवड.
- पीकांसाठी ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब केल्यामुळे संपूर्ण क्षेत्र बागायती.
- शेतीमध्ये ट्रॅक्टर, पेरणी यंत्र, सारा यंत्र, कडबा कुटटी यासारख्या सुधारीत औजारांचा वापर.
- विजेची बचत होण्यासाठी सौरउर्जावर चालणारा १.५ एचपीचा पंप बसविला त्याचप्रमाणे विहीरींचे पुनर्भरण.
- दुष्काळामध्ये शेतक-यांचे पशुधन जतन व्हावे म्हणुन जनावरांसाठी स्वतः पुढाकार घेवून चारा छावणी.
- जोडधंदा म्हणुन जर्सी गायींचे संगोपन व शेळी पालन आधुनिक पध्दतीने करुन दुग्धव्यवसाय.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. संग्राम माणिकराव डोंगरे

### मु.पो. साकोळ, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर



- सोयाबीन, ऊस व भूईमुगासारखी पिके घेत असुन पडीत क्षेत्रावर केशर आंब्याची लागवड.
- माती परीक्षण करुन शिफारसीनुसार शेतात खताचा वापर.
- एकात्मीक कीड व्यवस्थापन तंत्राचा वापर करुन कीडरोग नियंत्रण.
- भात पीक स्पर्धेत सहभाग घेऊन तालुका स्तरावर प्रथम व जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक.
- शेतीला दुग्धव्यवसायाची जोड.

६५

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. उमेश मोहनराव ठोकळ

### मु. पो. दहीगाव गावंडे, ता. जि. अकोला



- शेडनेट मध्ये टोमॅटो, काकडी, कोबी इ. पिके घेऊन भरघोस उत्पन्न.
- गावातील सांडपाणी एका ठिकाणी शेतात जमा करुन त्या पाण्यावर १५ एकर हरभ-याचे पिक घेतले.
- २० गुंठे क्षेत्रात काकडीचे विक्रमी ६० क्विंटल उत्पादन तसेच मिरची या पिकाचे १ एकर शेतीमध्ये ३५ क्विंटल विक्रमी उत्पादन.
- शेतामध्ये कांदा बिजोत्पादनाचा कार्यक्रम देखील राबविला.
- गावात शेतक-यांचा भाजीपाला उत्पादक गट स्थापन करुन त्याच्या माध्यमातून शेतक-यांना मार्गदर्शन.
- जिल्हा परीषदेमार्फत 'शेतीनिष्ठ' पुरस्काराने गौरव.
- आत्मा अंतर्गत कृषि मित्र म्हणून बहुमान प्राप्त.

६६

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## सौ.चंद्रकलाबाई प्रकाश सुरुशे

### मु. पो. शेलगाव आटोळ, ता. चिखली, जि. बुलढाणा



- डाळींब कलमाची निर्मीती करुन परिसरातील शेतक-यांना उपलब्ध करुन दिली.
- प्लॅस्टीक आच्छादनाचा वापर करुन खरबुज, कलिंगड व मिरचीचे मिश्र पीक घेण्याचा जिल्हयातून प्रथम प्रयोग.
- डाळींबाची मुंबई, बेंगलोर, इंदौर, अमरावती या सारख्या बाजारपेठेत प्रतवारी करुन विक्री.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय.
- जिल्हा परिषद बुलढाणातर्फे 'राष्ट्रमाता जिजाऊ प्रगतशील महिला शेतकरी' या पुरस्काराने गौरवित.

६७

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. अशोक बालाराम गायधने

### मु. शिवणी, पो. चिरचाळबांध, ता. आमगाव, जि. गोंदिया



- गोंदिया जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून ०.९२ हे.जमीन.
- श्री पध्दतीने भाताची लागवड करुन १५० टक्के जास्त उत्पादन .
- कंपोस्ट खत बनविण्यासाठी बायोगॅस स्लरीचा उपयोग तसेच गांडूळ खताची निर्मीती .
- फळपिकांबरोबर वांगी, कारली, दुधी भोपळा इ. भाजील्याची आधुनिक पध्दतीने लागवड.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणुन दुग्ध व्यवसाय.
- कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कृषी दिनाचे औचित्य साधुन मा.कृषिमंत्री महोदयांच्या हस्ते सन्मान.

६८

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. दिनेश नामदेवराव शेंडे

### मु. मेंढा, पो. पळसगाव (जाट), ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर



- विहीरीलगत नाला असल्याने पाणी अडवा व पाणी जिरवा अभियान अंतर्गत दरवर्षी वनराई बंधारा बांधल्याने विहीरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ.
- हिरवळीचे खताकरीता शेतामध्ये कल्चर कंपोस्ट खत निर्मिती.
- श्रीपध्दतीने भाताची लागवड केल्याने भरघोस उत्पन्न.
- धानाच्या एका लोंबापासुन बियाणे वाढ करुन सन-२००९ मध्ये 'त्रिवेणी १०/६१' ही नवीन धानाची जात विकसित.
- डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या सहकार्याने कृषि विज्ञान मंडळाची स्थापना केली असुन त्याव्दारे शेतक-यांना मार्गदर्शन.
- दुग्धव्यवसाय, कुकुटपालन हे पुरक व्यवसाय.

६१

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. संजय विठ्ठलराव अवचट

### मु. वाहितपूर पो. सुकळी स्टेशन, ता. सेलू, जि. वर्धा



- कृषि विभागाच्या सहकार्याने शेतकरी सहलीमध्ये भाग घेवून प्रगतशील व उच्चतंत्र आधारीत शेतक-यांच्या शेतीला भेटी देवुन तंत्रज्ञान अवगत केले.
- पॉलीहाऊसमध्ये जरबेरा, काकडी, सिमला मिरची या सारखी भाजीपाल्याची पीके तसेच फुलपीके घेऊन भरघोस उत्पन्न मिळविले.
- तुषार व ठिबक पध्दतीचा अवलंब.
- शेतीबरोबरच कुकुटपालन, दुग्धव्यवसाय व मधुमक्षिका पालनाचा व्यवसाय.
- स्वत: शेतीत प्रयोग करुन शेतक-यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातुन मार्गदर्शन.

७०

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## सर्वसाधारण गट

## श्री. सिताराम व्यंका मडावी

### मु. जिजगाव, पो. मन्नेराजाराम, ता. भामरागड, जि. गडचिरोली



७१

- कृषि विभागामार्फत एन.जी. रंगाराव इन्स्टीटयुट , हैद्राबाद येथे प्रशिक्षण घेवून स्वत: श्रीपध्दतीने भात लागवड केली.
- भामरागड परिसरातील आदिवासी, गरीब व होतकरु शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन.
- कृषि ग्रंथालयाची स्थापना.
- जैवविविधतेचे रक्षण व्हावे या करीता जुन्या भाताच्या लुचाई, परमा लुचाई, लालधान, तीळ, मटार या सारख्या पिकांच्या स्थानिक वाणांचे संवर्धन.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून वनोपज संकलन व मत्स्यव्यवसाय .

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## आदिवासी गट

## श्रीमती कासाबाई दत्तू शिद

### मु. मढवाडी, पो.कळमांड, ता. मुरबाड, जि. ठाणे



- ठाणे जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून १.२२ हेक्टर जमीन.
- नारळ, आंबा, केळी, सुपारी, चंदन व शेवगा इ. फळपिकांची लागवड.
- बांधावर ग्लिरीसिडीयाची लागवड करुन भात व भाजीपाला पिकांसाठी हिरवळीच्या खतांचा वापर.
- परीसरातील शेतक-यांना संघटीत करुन कृषि चर्चासत्र, कृषि मेळावे व प्रात्यक्षिकांव्दारे मार्गदर्शन व प्रबोधनाचे कार्य.
- शेती व्यवसायाबरोबरच पूरक उद्योग म्हणुन दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन.
- उत्पादीत गांडूळ खताचा तसेच जैविक खतांचा वापर करुन उत्पादन खर्चात बचत .

७२

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## आदिवासी गट

## श्री. संजय रतन ठाकरे

### मु. पो. भावनगर, ता. सटाणा, जि. नाशिक



७३

- नाशिक जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून ६.७५ हेक्टर जमीन.
- किटकनाशकांचा वापर कमी करुन एकात्मिक कीडरोग व्यवस्थापन तंत्राचा वापर .
- महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीची रोपवाटीका स्वत:च्या शेतात घेऊन विविध वृक्षांच्या प्रजातींच्या रोपांची निर्मिती.
- लोकसहभागातून वनराई बंधारा बांधुन पाणी अडविल्याने परिसरातील भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत.
- शेतामध्ये ट्रॅक्टर, बहुपिक मळणीयंत्र, सारायंत्र इ. सुधारीत अवजारांचा वापर.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## आदिवासी गट

## श्री. रमण खाप-या गावित

### मु.पो.रायपूर, ता. नवापूर, जि. नंदूरबार



७४

- नंदुरबार जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून १.६० हेक्टर जमीन .
- एक डोळा पध्दतीने ऊसाची लागवड करुन ऊसाचे भरघोस उत्पन्न.
- जमिनीची बांध बंदिस्ती करुन पावसाचे पाणी जमिनीतच मुरवण्याचा प्रयत्न .
- पिकांवरील किड नियंत्रणासाठी एकात्मिक किड व्यवस्थानाचा अवलंब.
- शेती उद्योगाबरोबरच पशुपालन, कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय.
- शेताच्या बांधावर फळबाग लागवड करुन शेती उत्पन्नात भर .

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## आदिवासी गट

## श्री. दिगंबर निंबाजी गवारी

### मु.पो. असाणे, ता. आंबेगाव, जि. पुणे



७५

- पुणे जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून १.३२ हे. शेतजमिन.
- जमीनीत बांध बंधीस्ती करून जलसंवर्धनावर भर.
- भात पिकामध्ये चारसुत्री पध्दतीचा अवलंब करून परीसरातील शेतक-यांना मार्गदर्शन.
- शेतामध्ये सारायंत्र, सायकल कोळपे, सुधारीत विळे, फवारणी पंप या सुधारीत औजारांचा वापर.
- पिकावरील किड नियंत्रणासाठी एकात्मिक किड व्यवस्थापनाचा अवलंब.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## आदिवासी गट

## श्री. किसन भु-या कास्देकर

### मु. बारु, ता. धारणी, जि. अमरावती



- अमरावती जिल्हयातील प्रगतशील शेतकरी असून एकूण ३.४७ हेक्टर जमिन.
- शेतीमध्ये बांधबंदिस्ती करुन मृद व जलसंवर्धन.
- कंपोष्ट खताची निर्मीती करुन त्याचा वापर शेतात केल्यामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास मदत .
- एकात्मिक किड व्यवस्थापनांतर्गत मित्रकिडींचे संगोपन व संवर्धन करुन पीक उत्पादनात वाढ करण्याचा टप्प्याटप्प्याने प्रयत्न .
- शेती व्यवसायाबरोबरच पूरक व्यवसाय म्हणुन दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन

७६

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २०१२

## आदिवासी गट

## श्री. बळवंत सदाशिव डडमल

### मु. मांडवा (मारवाडी) पो. आमगाव देवळी, ता. हिंगणा, जि. नागपूर



- नागपुर जिल्हयातील उच्चशिक्षित प्रगतशील शेतकरी
- कृषि विभागाच्या अभ्यास दौ-यात सहभागी होऊन लखनौ, कानपुर, इंदौर, पुणे, हैद्राबाद या ठिकाणी भेट देवून कृषि आधुनिक तंत्रज्ञान अवगत केले.
- हलक्या जमिनीत आवळा, बोर या फळपिकांची लागवड तसेच बांधावर ग्लिरीसिडीयाची लागवड करुन हिरवळीच्या खतासाठी वापर .
- शेतीबरोबरच कुक्कुटपालन, शेळीपालन व दुग्धव्यवसाय असे पूरक व्यवसाय.
- शेतक-यांचे गट स्थापन करुन सामूहिक शेती करण्याचा मानस .

७७